नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - १८१ | Issue - 181 | वार शुक्रवार दि. २१ नोव्हेंबर २०२५ | Blow- Friday Date 21 November 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# नितीश कुमार यांनी घेतली बिहारच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ

## शपथविधीने रचला नवा विक्रम; पंतप्रधान मोदींसह अनेक राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांची उपस्थिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : बिहार विधानसभा निवडणुकीत एनडीए भाजप आघाडीला मोठं बहुमत मिळालं असून २४३ जागांपैकी २०२ जागांवर विजय मि ळाला आहे. त्यामध्ये, नितीश कुमार यांच्या नेतृत्वात एनडीएने येथील निवडणुका लढवल्या होत्या. मात्र, भाजप सर्वाधिक जागा जिंकत येथे मोठा भाऊ बनल्याचं दिसून आलं. त्यामुळे, बिहारच्या मुख्यमंत्रीपदावर कोणाची वर्णी लागणार याची उत्सुकता देशाला होता. अखेर, बिहारचे मुख्यमंत्री म्हणून नितीश कुमार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह यांच्यासह दिग्गज नेत्यांच्या उपस्थितीत शपथ घेतली. बिहारच्या मुख्यमंत्रीपदासाठी त्यांनी १० वेळा शपथ घेऊन सर्वाधिक वेळा शपथ घेणारे मुख्यमंत्री बनण्याचा नवा विक्रम रचला आहे. बिहारची राजधानी पाटणा येथील गांधी मैदानात मोठ्या जनसमुदायासमोर हा शपथविधी संपन्न झाला.

बिहार विधानसभा निवडणुकीत भाजप आणि नितीश कुमार यांच्या जयदूने प्रत्येकी १०२ जागा लढवल्या होत्या. त्यापैकी, भाजपने ८९ तर जदयूने ८५ जागांवर विजय मिळवला. तर, चिराग पासव-ान यांच्या लोकजनशक्ती पक्षाला १९ जागा जिंकता आल्याने २०२ जागांसह मोठं बहुमत एनडीए आघाडीला मिळाले. त्यानंतर आज बिहारच्या मुख्यमंत्रीपदी नितीश कुमार यांनी १० व्यांदा शपथ घेतली, त्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जवळ येऊन नितीश कुमार यांचे अभिनंदन केले. तर, सम्राट चौधरी आणि विजय सिन्हा यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. तसेच, इतरही मंत्र्यांचा शपधविधी संपन्न झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सर्व मंत्र्यांचे अभिनंदन केले. या शपथविधी सोहळ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार हेही उप-स्थित होते.



बिहारमध्ये नितीश कुमार यांच्या नेतृत्वात भाजप एनडीने निवडणुका लढवल्या. पण, सर्वाधिक जागा भाजपने जिंकल्यामुळे मुख्यमंत्री कोण होणार याची उत्सुकता सर्वांनाच होती. कारण, भाजपने महाराष्ट्रातही विधानसभेच्या निवडणुका ह्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात लढल्या गेल्या होत्या. मात्र, एकनाथ शिंदेंच्या शिवसेना पक्षाला महाराष्ट्रात ५७ जागा जिंकता आल्या, तर भाजपने १३२ जागांवर विजय मिळवला होता. त्यामुळे, अर्थातच भाजपच महाराष्ट्रातही मोठा भाऊ ठरला. त्यानंतर, महाराष्ट्रात एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्री बनले, तर देवेंद्र फडणवीस यांना पुन्हा मुख्यमंत्रीपदाची संधी मिळाली. त्यामुळे, आता बिहारमध्येही महाराष्ट्र पॅटर्न राबवला जाईल की नितीश कुमार यांना संधी मिळेल याची चर्चा होती. अखेर, नितीश कुमार यांनी आज मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली.

बिहारमधील मंत्र्यांची यादी

सम्राट चौधरी, विजय कुमार सिन्हा, विजय कुमार चौधरी, बिजेंद्र प्रसाद यादव, श्रवण कुमार, मंगल पांडेय, डॉक्टर दिलीप जायसवाल, अशोक चौधरी, लेसी सिंह, मदन सहनी, नितिन नवीन, रामकृपाल यादव, संतोष कुमार सुमन,सुनील कुमार ,मो. जमा खान,संजय सिंह टाइगर, अरुण शंकर प्रसाद, सुरेंद्र मेहता, नारायण प्रसाद, रमा निषाद, लखेंद्र कुमार रोशन, श्रेयसी सिंह, डॉ. प्रमोद कुमार, संजय कुमार, संजय कुमार सिंह,दीपक प्रकाश.

# पंजाबच्या लुधियानामध्ये पोलीस आणि दहशतवादी यांच्यात चकमक, २ दहशतवाद्यांना अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चंदिगढ : पंजाबच्या लुधियाना येथून मोठी बातमी समोर येत आहे. लुधियाना येथे पोलीस आणि दहशतावादी यांच्यात चकमक झाली आहे. दिल्ली-अमृतसर राष्ट्रीय महामार्गावर लाडोवाल टोल प्लाज-ाजवळ ही चकमकीची घटना घडली आहे. विशेष म्हणजे पोलिसांनी एक दिवसअ-ाधीच अतिरेक्यांना हँड ग्रँनेडसोबत पकडले होते. या अतिरेक्यांची चौकशी केली असता इतर अतिरेक्यांची माहिति मिळाली होती. त्यानंतर पोलिसांकडून अतिरेक्यांना पकडण्यासाठी आज सापळा रचण्यात आला होता. अतिरेकी संबंधित मार्गाहून जाणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पण अतिरेकी तिथून जात



असताना त्यांनी थेट पोलिसांवर गोळीबार सुरु केला. त्यानंतर पोलिसांनी त्या गोळीबाराला प्रत्युत्तर दिलं. या गोळीबारात पोलिसांची गोळी लागल्याने दोन अतिरेकी जखमी झाल्याची माहिती आहे.


लुधियानाचे पोलीस आयुक्त स्वप्न शम ा यांनी या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. आम्ही आधी टेटर मॉड्यूलचा भंडाफोड केला आणि तीन आरोपींना पकडलं. त्यानंतर आम्हाला आज बब्बर खालसा इंटरनॅशनल (बीकेआय) संघटनेच्या अतिरेक्यांची माहिती आम्हाला मिळाली होती. हे आरेपी खड च्या सांगण्यानुसार काम करत होते. आम्ही घेराबंदी केली आणि चकमकीनंतर दोन संशयित आर-ोपी गंभीर स्वरुपात जखमी झाले आहेत, अशी माहिती पोलीस आयुक्तांनी दिली आहे.

दरम्यान, चकमक झालेल्या परिसराता आला पोलीस छावणीचे स्वरुप आले आहे. पोलीस आता सखोल तपास करत आहेत. या प्रकरणात पोलिसांकडून सविस्तर माहिती गोळा केली जात आहे. आरोपींचा मोठा घातपात घडवण्याचा कट होता, अशी चर्चा आहे. या घटनेनंतर आता पोलीस अलर्टवर आहेत. ठिक-ठिकाणी चेकिंग केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दहशतवाद्यांचे साथीदार हरियाणा आणि अन्य ठिकाणी होते. पोलिसांनी त्यांना सुद्धा ताब्यात घेतल्याची माहिती मिळत आहे. हे दहशतवादी वेगवेगळ्या ठिकाणी ग्रेनेड हल्ले करण्याच्या तयारीत होते. त्यांच्याकडून पिस्तूल, हँड ग्रेनेड पोलिसांनी जप्त केले आहेत. तसेच पोलिसांना दहशतावाद्यांकडे ५० पिस्तूलीच्या गोळ्या मिळाल्या आ-हेत. त्या पोलिसांनी जप्त केल्या आहेत. आरोपींचे साथीदार इतर राज्यांमधूनद-ेखील पकडले गेले आहेत. त्यामुळे या दहशतवाद्यांना अडवण्यात पंजाब पोलिसांना मोठं यश आल्याचं मानलं जात आहे.

# ताम्हिणी घाटातील थार अपघातातील मृतांची संख्या वाढली, अपघातात थारमधील ६ तरुणांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



रायगड : रायगडच्या ताम्हिणी घाटात थार अपघातातील सहा तरुणांचा मृत्यू झाला आहे. हे सर्व तरुण २१ ते २२ वयोगटातील आहेत. अजूनही या तरुणांचे मृतदेह बाहेर काढण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ संस्थेकडून ही मृतदेह बाहेर काढले जात असून पोलीस देखील या बचाव कार्यात योग्य ती मदत करत आहेत. थार कार मधील सर्व ६ तरुणांचा मृत्यू झाल्याची बाब समोर आली आहे. रेस्क्यू टीम कडून रोपच्या सहाय्याने या तरुणांचे मृतदेह अजूनही बाहेर काढले जात आहेत.हे सर्व तरुण पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील कोंडवे कोपरे गावातील असल्याची माहिती समोर आली आहे.

पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार १८ ते २२ वयोगटातील सहा युवक थार गाडी घेऊन त्यांच्या घरातून १७ नोव्हेंबरला पर्यटनासाठी निघाले होते. रात्री दीड ते दोनच्या दरम्यान वाहन अपघात अनिंयत्रित होऊन दरीत कोसळल्यानं अपघात झाल्याचं प्रथमदर्शनी दिसतं. या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला आहे. सहा जणांचे मृतदेह शोधण्यात आले आहेत. त्यापैकी एक मृतदेह रेस्क्यू टीमच्या मदतीनं बाहेर काढण्यात आला असून तो शवविच्छेदनासाठी माणगावला पाठवण्यात आला आहे. या बचावकार्यात तीन रेक्यू टीम कार्यरत असल्याची माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिली.

**अपघातातील तरुणांची नावे**

१) साहिल गोठे (वय २४) २) शिवा माने (वय २०) ३) प्रथम चव्हाण (वय २३) ४) श्री कोळी (वय १९) ५) ओमकार कोळी (वय २०) ६) पुनीत शेट्टी (वय २१) सर्व राहणार पुणे जिह्यातील कोंडवे कोपरे गावातील आहेत.

### फॉरेन्सिक टीमकडून अपघाताच्या कारणांचा शोध

**रायगड जिल्ह्यातील ताम्हिणी घाटातील एका मुख्य वळणावर एक थार कार वेगात येवून ५०० फूट खोल दरीत कोसळल्याची घटना समोर आल्यानंतर ताम्हिणी घाटातील या अपघातग्रस्त स्थळी फॉरेन्सिक टीम देखील दाखल झाली. अपघाताचे मूळ कारण आणि अपघात स्थळावरून हवेत गेलेली थार ५०० फ ूट खोल दरीत किती वेगात कोसळली असावी, याचा तपास घेण्यासाठी फॉरेन्सिक टीमचे अधिकारी घटनास्थळावर दाखल. झालेत कोसळलेल्या थार कारच्या वेगात लोखंडी बॅरिगेट्स आणि येथील लोखंडी खांबाचे तुकडे होऊन पडलेत त्यामुळे या कारचा वेग प्रचंड वेगात असावा असा अंदाज व्यक्त होतोय.**

## कोणाचा मुलगा, कोणाची बायको, कोणाचे वडिल यांनीच निम्मं मंत्रीमंडळ भरलं

# बिहारी मंत्रीमंडळात घराणेशाहीच्या नावानं चांगभलं!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पटणा : जनता दल (संयुक्त) चे राष्ट्रीय अध्यक्ष नितीश कुमार यांनी आज (२० नोव्हेंबर) पाटणा येथील ऐतिहासिक गांधी मैदानात विक्रमी १० व्यांदा बिहारचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांनी २६ इतर नेत्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. मंत्र्यांमध्ये भाजपचे १४, जेडीयूचे ८, एलजेपीचे २ आणि एचएएम आणि आरएलएमचा प्रत्येकी १ यांचा समावेश आहे. बिहारी मंत्रीमंडळात घराण-ेशाहीचा वरचष्मा झाला असून कोणाचा मुलगा, मुलगी, बायको, वडिल यांनी जवळपास अर्धे मंत्रीमंडळ भरलं आहे. नितीश कुमार मंत्रिमंडळात फक्त एक अल्पसंख्याक मंत्री आहे. नितीश कुमार यांनी जामा खान यांना मंत्री म्हणून नियुक्त केले आहे.

मंत्री झालेल्या भाजप नेत्यांची यादी:

सम्राट चौधरी, विजय सिन्हा, लखेंद्र कुमार रोशन, श्रेयसी सिंह, प्रमोद कुमार, संजय सिंग टायगर, अरुण शंकर प्रसाद, सुरेंद्र मेहता, नारायण प्रसाद, रामा निषाद, नितीन नवीन, रामकृपाल यादव, मंगल पांडे, दिलीप जयस्वाल.

मंत्री झालेले जेडीयू नेते:

मोहम्मद जामा खान, लेसी सिंग, मदन साहनी, विजय चौधरी, बिजेंद्र प्रसाद यादव, श्रवण कुमार, अशोक चौधरी आणि सुनील कुमार.

एलजेपी (आर)

संजय कुमार सिंह आणि संजय कुमार. आरएलएमचे दीपक प्रकाश आणि एचएएमचे संतोष सुमन मंत्री झाले आहेत.

घराणेशाहीतून मंत्री कोण आहेत?

सम्राट चौधरी - ज्येष्ठ नेते शकुनी चौधरी यांचे पुत्र.

श्रेयसी सिंह - दिवंगत माजी केंद्रीय मंत्री दिग्विजय सिंह यांची कन्या.

अशोक चौधरी - ज्येष्ठ काँग्रेस नेते महावीर चौधरी यांचे पुत्र.

विजय चौधरी - वडील जगदीश प्रसाद हे काँग्रेसचे सदस्य होते आणि त्यांनी आम दार म्हणूनही काम केले.

लेसी सिंह - पती भूतान सिंह, समता पक्षाचे नेते.

नितीन नबिन - नबिन सिन्हा यांचे पुत्र आणि माजी आमदार.

संतोष सुमन - जितन राम मांझी यांचे पुत्र.

रमा निषाद - अजय निषाद यांच्या पत्नी आणि माजी खा-सदार कॅप्टन जयनारायण निषाद यांच्या सून.

दीपक प्रकाश - उपेंद्र कुशवाह यांचे पुत्र, त्यांची आई देखील आमदार म्हणून निवडून आली होती.

मागील सरकारमध्ये मंत्री असलेले पण यावेळी नियुक्त न झालेले:

रत्नेश सदा, जयंत राज कुशवाह, जीवेश कुमार, शीला मंडल, महेश्वर हजारी, संतोष सिंह, केदार गुप्ता, कृष्णनंदन प्रसाद, हरी साहनी, जनक राम, राजू कुमार सिंह, नितीश मिश्रा, नीरज सिंह, रेणू देवी, विजय कुमार मंडल, कृष्ण कुमार मंटू, मोती लाल प्रसाद आणि प्रेम कुमार.

कोणते नवीन चेहरे समाविष्ट करण्यात आले?

दिलीप जयस्वाल, रामकृपाल यादव, रमा निषाद, अरुण शंकर प्रसाद, प्रमोद कुमार, श्रेयसी सिंह, लखेंद्र कुमार, दीपक प्रकाश, संजय सिंह टायगर, संजय कुमार सिंह, संजय कुमार, नारायण प्रसाद.

सर्वात श्रीमंत मंत्री कोण आहेत?

रमा निषाद सर्वात श्रीमंत आहेत. त्यांची संपत्ती अंदाजे ₹३१ कोटी इतकी आहे.

महिला मंत्री किती आहेत?

श्रेयसी सिंह, लेसी सिंह आणि रमा निषाद या तीन म हिला मंत्री आहेत.

सर्वात कमी आणि सर्वात कमी शिक्षित मंत्री कोण आ-हेत?

अशोक चौधरी, दिलीप जयस्वाल आणि संतोष सुमन यांनी पीएचडी केली आहे. नारायण प्रसाद यांनी दहावी उत्तीर्ण केले आहे.

सर्वात तरुण मंत्री

मंत्रिमंडळातील सर्वात तरुण श्रेयसी सिंह ३४ वर्षांच्या आहेत. सरासरी वय सुमारे ५६ आहे.


१४ मंत्री ज्यांच्यावर फौजदारी खटले नाहीत

नवीन मंत्रिमंडळात १४ मंत्री आहेत ज्यांच्यावर फौजदारी खटले नाहीत. यामध्ये विजय सिन्हा, लखेंद्र कुमार रोशन, श्रेयसी सिंह, संजय कुमार, दीपक प्रकाश, संजय सिंग टायगर, सुरेंद्र मेहता, नारायण प्रसाद, लेसी सिंग, सुनील कुम ार, विजय चौधरी, विजेंद्र प्रसाद यादव आणि श्रवण कुमार यांचा समावेश आहे. नितीन नबीन यांच्याविरुद्ध सर्वाधिक पाच गुन्हे दाखल आहेत.

जातीच्या बाबतीत, आठ उच्च जाती, आठ ओबीसी, पाच ईबीसी, पाच दलित आणि एक मुस्लिम आहे. यामध्ये चार राजपूत, दोन भूमिहार, एक ब्राह्मण, एक कायस्थ, दोन यादव, दोन कुशवाह, दोन कुर्मी आणि दोन वैश्य यांचा समावेश आहे. पाच अनुसूचित जातींमध्ये एक पासी, एक मुसहर, एक रविदास आणि दोन पासवान यांचा समावेश आहे. ईबीसीम ध्ये, कहार, मल्लाह, निषाद, धनुक आणि तेली समुदायातून प्रत्येकी एक मंत्री निवडून आला आहे.

राज्यात मुस्लिम लोकसंख्या अंदाजे १७ टक्के आहे, तर यादव समुदाय १४ टक्के आहे. दोन यादव आणि एक मुस्लिम नेता मंत्री झाला आहे. राजपूत ३.४५ टक्के, ब्राह्मण ३.६६ टक्के, भूमिहार २.८६ टक्के, कुशवाह ४.२७ टक्के, कुर्मी २.८८ टक्के, अनुसूचित जाती १९.६५ टक्के आणि इतर ३१.२७ टक्के आ-हेत.

जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक




प्रचार साहित्य

अत्याधुनिक निवडणूक मोबाईल ॲप वापरा व हमखास निवडून या.

फक्त आमच्या कडेच

मतदार स्लिप नांव व मतदान केंद्रासहीत फक्त आमच्याकडेच मिळतील.

प्रचार साहित्य

१. डमी वोटिंग मशिन
२. झेंडे, टोपी,पंचा ३. बिल्ले
४. मतदार स्लिप ५.स्टिकर ६.पॉम्प्लेटस
७. स्लिप प्रिंटर ८. सॉफ्टवेअर
९. बॅचेस १०. एस.एम.एस./व्हाईस कॉल

नितीन कन्सलटन्सी

नितीन हलसगी

मो. 9595427070 / 9270325070

## संपादकीय....

### टेरर मॉड्यूलचा भांडाफोड

पंजाबच्या लुधियाना येथून मोठी बातमी समोर येत आहे. लुधियाना येथे पोलीस आणि दहशतावादी यांच्यात चकमक झाली आहे. दिल्ली-अमृतसर राष्ट्रीय महामार्गावर लाडोवाल टोल प्लाजाजवळ ही चकमकीची घटना घडली आहे. विशेष म्हणजे पोलिसांनी एक दिवसआधीच अतिरेक्यांना हँड ग्रँनेडसोबत पकडले होते. या अतिरेक्यांची चौकशी केली असता इतर अतिरेक्यांची माहिती मिळाली होती. त्यानंतर पोलिसांकडून अतिरेक्यांना पकडण्यासाठी आज सापळा रचण्यात आला होता. अतिरेकी संबंधित मार्गाहून जाणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पण अतिरेकी तिथून जात असताना त्यांनी थेट पोलिसांवर गोळीबार सुरु केला. त्यानंतर पोलिसांनी त्या गोळीबाराला प्रत्युत्तर दिलं. या गोळीबारात पोलिसांची गोळी लागल्याने दोन अतिरेकी जखमी झाल्याची माहिती आहे. लुधियानाचे पोलीस आयुक्त स्वप्न शर्मा यांनी या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. आम्ही आधी टेटर मॉड्यूलचा भंडाफोड केला आणि तीन आरोपींना पकडलं. त्यानंतर आम्हाला आज बब्बर खालसा इंटरनॅशनल (बीकेआय) संघटनेच्या अतिरेक्यांची माहिती आम्हाला मिळाली होती. हे आरेपी खडच्या सांगण्यानुसार काम करत होते. आम्ही घेराबंदी केली आणि चकमकीनंतर दोन संशयित आरोपी गंभीर स्वरुपात जखमी झाले आहेत, अशी माहिती पोलीस आयुक्तांनी दिली आहे. चकमक झालेल्या परिसराता आला पोलीस छावणीचे स्वरुप आले आहे. पोलीस आता सखोल तपास करत आहेत. या प्रकरणात पोलिसांकडून सविस्तर माहिती गोळा केली जात आहे. आरोपींचा मोठा घातपात घडवण्याचा कट होता, अशी चर्चा आहे. या घटनेनंतर आता पोलीस अलर्टवर आहेत. ठिक-ठिकाणी चेकिंग केली जात आहे.

## पंढरपूर पाटबंधारे उपविभागाच्या शासकीय भूसंपादित जमिनीवरील अतिक्रमण काढण्याचे आवाहन

सोलापूर (जिमाका) : निरा उजवा कालवा कार्यकारी अभियंता यांच्या अधिनस्त उपविभागीय अभियंता,पंढरपूर पाटबंधारे उपविभाग, पंढरपूर यांचे कार्यक्षेत्र मैल ९३ ( साखळी क्र. १५०/००० ) पासून निरा उजवा मुख्य कालवा, निरा उजवा कालवा शाखा क्र. ३, शाखा क्र.४, तिसंगी मध्यम प्रकल्प, व तिसंगी मध्यम प्रकल्पावरील मुख्य कालवा व त्यावरील वितरिका यांच्यावरील कालवा वितरिका, लघुवितरिका व इतर प्रयोजनासाठी संपादित केलेल्या शासकीय भूसंपादित जमिनीवरील कृषी / वाणिज्य / रहिवासी व इतर अतिक्रमण केलेले कार्यक्षेत्रावर आढळून येत असून हे अतिक्रम दि. २८ नोव्हेंबर २०२५ पूर्वी तात्काळ काढून घेण्यात यावे, असे आवाहन प्रसिध्दी पत्रकान्वये उपविभागीय अभियंता, पंढरपूर पाटबंधारे उपविभाग यांनी केले आहे.

वरील अतिक्रमण दि. २८ नोव्हेंबर २०२५ पूर्वी संबंधिताने तात्काळ काढून घेण्यात यावे. अन्यथा त्यानंतर कोणतीही पूर्व सूचना न देता अतिक्रमण काढण्यात येईल. होणाऱ्या नुकसानीस संबंधित अतिक्रमण धारक शेतकरी / व्यक्ती जबाबदार राहील, असे पत्रकात नमूद आहे.

# निवडणूक प्रक्रिया पारदर्शक ठेवण्यासाठी आदर्श आचारसंहितेचे पालन; आपली सामूहिक जबाबदारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागरिक व मतदारांमध्ये समाजमाध्यमांद्वारे विविध प्रकारच्या माहितीची देवाण - घेवाण होत असते. त्यावरून ती आपली मते बनवितात. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवरही त्यातून प्रभाव पडतो. त्यामुळे माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीने समाजमाध्यमांचे सनियंत्रण करीत आहे. समाजमाध्यमद्वारे प्रसारित होणाऱ्या खोट्या बातम्यांना (फेक न्यूज) किंवा चुकीच्या माहितीला आळा घालण्यासाठी माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीने नेहमीच सजग राहणे आवश्यक आहे. खोट्या बातम्यासंदर्भात वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी (फॅक्ट चेक) पत्र सूचना कार्यालय (पीआयबी) किंवा पोलिस यंत्रणेकडे सुविधा उपलब्ध असल्यास, त्या सुविधेचा आधार किंवा संबंधितांची मदत घेता येईल.

समाजमाध्यमांवरील खोट्या बातम्या किंवा चुकीची माहिती निदर्शनास आल्यास किंवा ती अन्य कुणी निदर्शनास आणून दिल्यास त्याबाबत तातडीने उचित कार्यवाही करण्यात येते. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश असल्यास किंवा तसे आदेश दिल्यास उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रे दाखल करताना आपल्या अधिकृत समाजमाध्यम खात्यांचा (सोशल मीडिया हँडल्स्) तपशील देणे आवश्यक असेल. त्यात ई-मेल आयडीसह अन्य तपशील नमूद करणे बंधनकारक राहील. समाजमाध्यमांचा समावेश इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या श्रेणीत करण्यात आला आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील सोशल मीडियासाठीच्या प्रस्तावित जाहिरातीचेसुद्धा परिच्छेद- ४ (१) नुसार पूर्वप्रमाणन करणे आवश्यक आहे. परंतु, अन्य इलेक्ट्रॉनिक मीडियासाठी प्रस्तावित जाहिरातीचे पूर्वप्रमाणन केले असल्यास, ही जाहिरात सोशल मीडियावरदेखील प्रसारित प्रसिद्ध करता येईल. त्यासाठी पुन्हा पूर्वप्रमाणन करण्याची आवश्यकता नाही.

निवडणुकीच्या प्रचारासाठी समाजमाध्यमांचा वापर केला असल्यास त्यासाठी आलेल्या खर्चाचा (उदा. मजूकर तयार करणे, क्रिएटिव्हज् तयार करणे, समाजमाध्यमे हाताळणाऱ्यांचा मोबदला आदी.) समावेश संबंधित उमेदवार किंवा राजकीय पक्षाने आपल्या निवडणूक खर्चात करणे आवश्यक आहे. प्रसारमाध्यमांच्या विविध संस्था, संघटनांनी स्वेच्छेने तयार केलेल्या आचारसंहितेचे किंवा मार्गदर्शक तत्वांचे पालन करणे अपेक्षित आहे. त्याचबरोबर राज्य निवडणूक आयोगाने स्वतंत्र आदेशाद्वारे निर्गमित केलेल्या सर्वसमावेशक आचारसंहितेबाबतही दक्षता घेणे आवश्यक आहे.

जनमत आणि मतदानोत्तर चाचण्यांसंदर्भातील दक्षताः जनमत चाचण्या (ओपिनियन पोल) आणि मतदानोत्तर चाचण्याबाबत (एक्झिट पोल) प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाने असा सल्ला दिला आहे की, वृत्तपत्रांनी बहुमूल्य मंचाचा वापर, निवडणुकांचा विपर्यास आणि त्यात ढवळाढवळ करण्यासाठी केला जाऊ नये म्हणून खबरदारी घ्यावी. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातही नमुन्याच्या (सॅम्पल) आधारावर विविध चाचण्या घेतल्या जातात. त्यातून निवडणुकांच्या निकालांबाबत वर्तविल्या जाणाऱ्या अंदाज, निष्कर्षांचा लोकमतावर, मतदारांवर प्रभाव पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**भाग दोन**

विविध चाचण्यांच्या निष्कर्षांचा मतदारांवरील संभाव्य प्रभाव टाळण्यासाठी, संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचा जाहीर प्रचाराचा कालावधी समाप्तीपासून ते मतदानाची वेळ संपल्याच्या पुढील एक तासापर्यंत अशा चाचण्यांचे निष्कर्ष जाहीर करता येणार नाहीत. मतदान प्रक्रिया विविध टप्प्यांत पार पडणार असल्यास, पहिल्या टप्प्याच्या मतदानाचा जाहीर प्रचाराचा कालावधी समाप्तीपासून ते शेवटच्या टप्प्याचे मतदान संपल्याच्या पुढील एक तासापर्यंत कोणत्याही अशा चाचण्यांचे निष्कर्ष जाहीर करता येणार नाहीत. आवश्यकता भासल्यास राज्य निवडणूक आयोगाकडून यथोचित प्रासंगिक स्वरूपात स्वतंत्रपणे या चाचण्यांसंदर्भात स्पष्टीकरण करण्यात येईल.

जाहीर प्रचाराची समाप्ती व जाहिरातींची प्रसिद्धीः संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मुद्रित, इलेक्ट्रॉनिक, समाजमाध्यमे आदी माध्यमद्वारे कोणत्याही प्रचारविषयक जाहिराती देता येणार नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा जाहीर प्रचार समाप्तीच्या कालावधी संबंधित कायद्यांमध्ये पुढीलप्रमाणे नमूद आहेत. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम, १९६५ चे कलम २३ (१) अन्वये, कोणत्याही व्यक्तीने एखाद्या प्रभागामध्ये ज्या तारखेस किंवा तारखांस त्या प्रभागातील एखाद्या निवडणुकीकरिता मतदान घेण्यात येईल, त्या तारखेस किंवा तारखांस कोणतीही जाहीर सभा बोलविता, भरविता किंवा सभेला हजर राहता कामा नये.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित कायद्यातील जाहीर प्रचारासंदर्भातील उपरोक्त तरतुदी लक्षात घेता, जाहीर प्रचार समाप्तीनंतर मुद्रित, इलेक्ट्रॉनिक आणि समाजमाध्यमांद्वारे खाली नमूद केलेल्या कालावधीनंतर कोणत्याही व्यक्तीस, उमेदवारास, राजकीय पक्षास प्रचार करता येणार नाही किंवा प्रचाराच्या जाहिराती प्रसिद्ध, प्रसारित करता येणार नाहीत.

■ नगरपरिषद,नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांबाबतः मतदान सुरू होण्याच्या दिनांकास निर्बंध असतील. उदा. १० तारखेस मतदान असल्यास ९ तारखेला रात्री १२ वाजता प्रचारासोबत जाहिरात प्रसिद्धी, प्रसारणदेखील बंद होईल. मात्र ९ तारखेला रात्री १० नंतर प्रचलित अधिनियम, नियमानुसार सभा, प्रचारफेऱ्या.ध्वनिवर्धकाचा वापर करता येणार नाही.

आचारसंहितेच्या कालवधीतील शासनाच्या जाहिरातीः केंद्र, राज्य, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय निमशासकीय संस्था, सार्वजनिक उपक्रम इत्यादींना आचारसंहितेच्या कालावधीत विविध कल्याणकारी योजना, विविध सवलती; तसेच शासनाच्या कामगिरीबाबत कोणत्याही प्रकारे सार्वजनिक पैशातून जाहिराती प्रसारित, प्रसिद्ध करण्यावर बंदी असेल. सार्वजनिक पैशातून स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन आदी राष्ट्रीय सण-उत्सवांच्या दिवशी केवळ शुभेच्छांपर जाहिराती प्रसिद्ध करता येतील; परंतु त्यातून कुठल्याही योजनेचा किंवा सवलतीचा प्रचार प्रसार करता येणार नाही आणि मतदारांवर प्रभाव पडेल, असे कुठलेही कृत्य करता येणार नाही. त्याचबरोबर त्या जाहिरातींवर पंतप्रधान, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री व अन्य पदाधिकाऱ्यांची छायाचित्रे वापरता येणार नाहीत.

आचारसंहितेच्या कालावधीत राज्य शासकीय व इतर सेवा, निमशासकीय संस्था, शासकीय मंडळे, महामंडळे, सार्वजनिक उपक्रमे आदी संस्थांमध्ये भरती करण्याच्यादृष्टीने जाहिराती प्रसारित, प्रसिद्ध करता येणार नाहीत. आचारसंहितेच्या कालावधीत राज्य शासन, निमसरकारी संस्था, शासकीय मंडळे, महामंडळे, सार्वजनिक उपक्रमे आदींना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेसंदर्भातील निविदेच्या जाहिराती प्रसारित, प्रसिद्ध करता येणार नाहीत.

राजकीय स्वरुपाच्या मुलाखती व चर्चात्मक कार्यक्रमः आचारसंहितेच्या कालावधीत राजकीय स्वरुपाच्या मुलाखती किंवा चर्चात्मक कार्यक्रम मुद्रित, इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून प्रसिद्ध, प्रसारित करण्यास मनाई नाही; तसेच त्यासाठी पूर्वप्रमाणन किंवा परवानगीची आवश्यकता नाही. मात्र, मुलाखती, कार्यक्रम,चित्रण (फुटेज) जुने असल्यास त्यावर तसा उल्लेख करणे आवश्यक राहील. परंतु, राज्य निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या आचारसंहितेच्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी अशा मुलाखती, चर्चात्मक कार्यक्रम प्रसिद्ध, प्रसारित करणाऱ्या प्रसारमाध्यमांची आणि त्यात सहभागी होणारे राजकीय पक्षाचे नेते,प्रतिनिधी, उमेदवारांची जबाबदारी असेल. ही मुलाखत किंवा कार्यक्रम पेडन्यूजच्या स्वरुपात असल्याचे सिद्ध झाल्यास संबंधित समितीकडून नियमानुसार कार्यवाही केली जाईल.

आचारसंहितेच्या कालावधीत सार्वजनिक ठिकाणी आयोजित करण्यात येणाऱ्या जाहीर चर्चात्मक कार्यक्रमात आणि त्याच्या प्रसारण, प्रसिद्धीमुळे धार्मिक किंवा जातीय तेढ, तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवणार नाही, याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित प्रसारमाध्यम, आयोजक आणि त्यात सहभागी नेते, राजकीय पक्षाचे प्रतिनिधी, उमेदवारांची राहील. त्याचबरोबर कार्यक्रमासाठी विविध विभाग, यंत्रणांकडून आवश्यक परवानग्या घेण्याचीही जबाबदारी आयोजकांची असेल. जाहीर किंवा स्टुडिओतील चर्चात्मक कार्यक्रमद्वारे कुठल्याही एका पक्षाचा किंवा उमेदवाराचा प्रचार होणार नाही, याचीही दक्षता घेणे आवश्यक आहे.

निवडणूक प्रक्रिया निर्भय, पारदर्शक व सुरळीत पार पडण्यासाठी, निवडणूक कालावधीत सर्व संबंधितांनी आचारसंहितेतील नियमांचे काटेकोरपणे पालन करुन यंत्रणेला सहकार्य करावे.

**क्रमशः....**

**संकलन: जिल्हा माहिती कार्यालय, पुणे**

# वित्तीय भांडवलशाही : नवे साम्राज्य, नवा गुलाम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आजच्या काळात जगावर राज्य करणारे साम्राज्य शस्त्रांनी नाही, तर 'पैशाने' चालते. हीच आहे वित्तीय भांडवलशाही जिथे भांडवल, म्हणजे पैसा, बाजार आणि बँकिंग यंत्रणा मिळून सत्तेचे खरे केंद्र बनले आहे. पूर्वी साम्राज्ये तोफा, तलवारी आणि सैन्याच्या जोरावर उभी राहत. आज ती संगणकाच्या स्क्रीनवर, शेअर बाजाराच्या चढउतारात आणि बँकांच्या निर्णयांत उभी राहतात. एका क्लिकवर अब्जावधी डॉलर एका देशातून दुसऱ्या देशात हलवले जातात आणि त्या हालचालीवर संपूर्ण राष्ट्रांचे भविष्य अवलंबून असते. ही व्यवस्था कामगार, शेतकरी आणि सामान्य जनतेच्या कष्टावर उभी आहे, पण नफा मात्र काही हातात केंद्रित आहे. कॉर्पोरेट्स, गुंतवणूक बँका आणि वित्तीय संस्थांनी जगाचा नकाशाच बदलून टाकला आहे.

आज बहुतेक देशांचा अर्थसंकल्प, विकासनीती आणि सामाजिक धोरणेही आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांच्या अटींवर ठरतात. विकासाच्या नावाखाली देश कर्जाच्या ओझ्याखाली जातात आणि त्यांच्या लोकशाहीवर 'बाजार' अधिराज्य गाजवतो. शेअर बाजारातील घसरण म्हणजे सर्वसामान्य माणसाचे भविष्य धोक्यात. चलनवाढ वाढली की गरिबांचा स्वप्नांचा संसार मोडतो, पण काही 'गुंतवणूकदार' मात्र या अस्थिरतेतूनही नफा कमावतात. हीच तर भांडवलशाहीची निर्दयी गणिती पद्धत आहे.



**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

आज वित्तीय साम्राज्य केवळ बँकांपुरते मर्यादित नाही. डिजिटल पेमेंट्स, क्रिप्टोकरन्सी, फिनटेक कंपन्या आणि ई-कॉमर्स यांनी नवीन आर्थिक गुलामी निर्माण केली आहे. डेटा म्हणजेच नवीन सोनं झालं आहे. मोठ्या कंपन्या तुमच्या खरेदीच्या सवयी, आवडीनिवडी आणि स्वप्नांचाही व्यापार करतात. ग्राहक आता ग्राहक राहिला नाही तर तो एक डेटा प्रॉडक्ट बनला आहे. भारतातील आर्थिक सुधारणांनंतर (१९९१ पासून) वित्तीय भांडवलशाहीने आपले पाय खोलवर रोवले. खासगीकरण, परकीय गुंतवणूक आणि कॉर्पोरेट अनुदान यांच्या जोरावर संपत्तीची मोजकी केंद्रे तयार झाली. एकीकडे शेअर बाजार तेजीत, तर दुसरीकडे शेतकरी आत्महत्या ही विषमता वित्तीय भांडवलशाहीची सर्वात क्रूर ओळख आहे.

राजकीय पक्षांनाही निधी देणारे हेच कॉर्पोरेट घराणे. त्यामुळे लोकशाहीचे निर्णय 'जनतेसाठी' नव्हे तर 'गुंतवणूकदारांसाठी' घेतले जातात. माध्यमांपासून धोरणांपर्यंत सर्वत्र पैशाची छाप दिसते. परिणामतः जनतेचे शासन 'कॉर्पोरेट लोकशाही' बनले आहे. वित्तीय भांडवलशाहीविरोधात संघर्ष म्हणजे फक्त आर्थिक नव्हे तर सांस्कृतिक आणि वैचारिक लढा आहे. स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत करणे, सहकार, शेती, हस्तकला आणि नैतिक गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे, वित्तीय शिक्षण आणि पारदर्शक बँकिंग ही काही प्राथमिक पावले आहेत. परंतु खरी गरज आहे, मानवकेंद्री अर्थव्यवस्थेची. पैसा साधन राहावा, उद्देश नव्हे. आज जगात सर्वात मोठा धोका अणुबॉम्ब नाही, तर पैशाच्या हातात आलेली सत्ता आहे. वित्तीय भांडवलशाहीने माणसाला ग्राहक बनवले, समाजाला बाजार आणि राष्ट्रांना कंपन्यांचे शेअर बनवले. ही साखळी तोडायची असेल, तर विचार बदलावा लागेल माणूस पैशासाठी नव्हे, पैसा माणसासाठी या तत्त्वाकडे परत जावं लागेल.

# डोंगराळेतील ४ वर्षीय चिमुकलीवर निर्घृण अत्याचार व हत्येप्रकरणी आरोपीला फाशीची द्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

मालेगाव तालुक्यातील डोंगराळे गावात. घडलेल्या थरारक घटनेने संपूर्ण जिल्हा हादरला असून कु.यज्ञा जगदीश दुसाने (वय ४) या निरागस चिमुकलीवर प्रथम अत्याचार करून त्यानंतर निर्घृणरीत्या हत्या करण्यात आली. या क्रूर आणि हृदय पिळवटून टाकणाऱ्या गुन्ह्याच्या विरोधात संपूर्ण समाजातून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

या प्रकरणातील आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा देण्यात यावी, या मागणीसाठी शिवस्वराज्य युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य यांनी नाशिक जिल्हाधिकारी व मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना निवेदन देण्यात आले आहे ,

यावेळी संघटनेचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष . पोपट आत्माराम पताडे यांच्या नेतृत्वाखाली.हे निवेदन देण्यात आले असून. या प्रसंगी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मधुकर भोर, नाशिक जिल्हा सोशल मीडिया सेल अध्यक्ष . ऋषिकेश वाबळे, नाशिक जिल्हा



**शिवस्वराज्य युवा प्रतिष्ठानची जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे मागणी**

अध्यक्ष अंकुश गुंजाळ, नाशिक जिल्हा महिला आघाडी अध्यक्ष वनिता सोनावणे, नाशिक जिल्हा संपर्कप्रमुख सुरेखा जगताप, नाशिक तालुका महिला आघाडी अध्यक्ष सोनाली जुद्रे, इगतपुरी तालुका अध्यक्ष अक्षय दगु राव, इगतपुरी तालुका महिला आघाडी अध्यक्ष भारती संतोष नाठे, मालेगाव तालुका महिला आघाडी अध्यक्ष कविता संदीप कदम, मालेगाव तालुका अध्यक्ष अंकित पवार. निवेदनात पुढे म्हटले की- अशा भयानक अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये तात्काळ व कठोर शिक्षाच समाजातील गुन्हेगारांना रोखू शकते. पीडितेला न्याय मिळावा यासाठी आरोपीला फाशीची शिक्षा दिलीच पाहिजे. निवेदनाद्वारे कारवाई वाढवण्याची मागणी करण्यात आली.

**'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या अधिवेशनातील १५ ठराव तातडीने मंजूर करण्याची मागणी** | **संदीप काळे यांचा इशारा**

# सरकारने पत्रकारिता हा विषय गांभीर्याने घ्यावा अन्यथा रस्त्यावर उतरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : 'व्हॉईस ऑफ मीडिया' - 'व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरम'चे महाराष्ट्र राज्य शिखर अधिवेशन पंढरपूर येथे अत्यंत उत्साहात आणि भव्य स्वरूपात पार पडले. राज्यभरातून तब्बल दोन हजारांहून अधिक पत्रकारांनी उपस्थित राहून दोन दिवसीय अधिवेशनाला अभूतपूर्व प्रतिसाद दिला. पत्रकारांच्या हक्कांसाठी, सुरक्षिततेसाठी आणि सुदृढ पत्रकारितेसाठी एकूण १५ ठराव अधिवेशनात एकमताने संमत करण्यात आले. हे सर्व ठराव राज्य सरकारने तातडीने मंजूर करून त्याची अंमलबजावणी करावी, अन्यथा राज्यातील पत्रकार रस्त्यावर उतरतील, असा तीव्र इशारा 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांनी दिला.

अधिवेशनात पत्रकारांचे किमान वेतन शासनाने निश्चित करून त्याची सक्तीने अंमलबजावणी करावी, पत्रकार सुरक्षा कायदा अधिक कडक करावा आणि जिल्हा-तालुका पातळीवर पत्रकार संरक्षण अधिकारी नेमावेत, अशा मागण्यांना प्राधान्य देण्यात आले. सर्व पत्रकार व त्यांच्या कुटुंबियांसाठी १० लाखांचा आरोग्य विमा आणि २५ लाखांचा



अपघात विमा अनिवार्य करावा, पत्रकार निवृत्तीवेतन योजना लागू करावी आणि सरकारी गृहनिर्माण योजनांमध्ये पत्रकारांसाठी २% राखीव कोटा देण्यात यावा, असे ठरावही संमत करण्यात आले. जिल्ह्यातील प्रेस-क्लबांचे आधुनिकीकरण, माहिती खात्यात 'मीडिया सपोर्ट सेल' स्थापन करणे, राज्यस्तरीय पत्रकार प्रशिक्षण अकादमी उभारणे, पत्रकार अधिवेशनांना सरकारी आर्थिक सहाय्य, न्यूज-पोर्टल नोंदणी प्रक्रिया सुलभ करणे आणि पत्रकारांवरील खोटे खटले मागे घेण्यासाठी विशेष समिती स्थापणे, या ठरावांनाही व्यापक पाठिंबा मिळाला.

आपत्तीग्रस्त पत्रकारांसाठी तात्काळ मदत निधी, महिला पत्रकारांसाठी सुरक्षित निवास, प्रवास भत्ता, मातृत्व रजा, क्रेच सुविधा आणि लैंगिक छळ प्रतिबंधासाठी कडक यंत्रणा लागू करावी, असा ठरावही अधिवेशनात मंजूर करण्यात आला. तसेच राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील विशेष पत्रकार सन्मान व गौरव योजना सुरू करण्याचाही ठराव एकमुखी पारित झाला.

अधिवेशनात पारित केलेले सर्व १५ ठराव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्य मंत्रिमंडळाला प्रत्यक्ष भेटून सादर करण्यात येणार असल्याचे संघटनेने जाहीर केले. तसेच सर्व पालकमंत्र्यांनाही स्थानिक पातळीवर भेटून मागण्यांचे स्मरण करून देण्यात येईल. सरकारने मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास पुढील आंदोलनाची दिशा निश्चित करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के, सर्व राज्य पदाधिकारी, सर्व राज्य कोर टीम यांनी दिला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# नगरसेवक पदाचे ५ उमेदवारासह ८ जणांचे नामनिर्देशन अर्ज अपात्र

## सिंदखेड राजा नगरपरिषद निवडणुकीची छानणी प्रक्रिया




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

मा.राज्य निवडणूक आयोगाने नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता निवडणूक कार्यक्रम घोषित केलेला असून दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. सदर निवडणुकीच्या अनुषंगाने दिनांक १० नोव्हेंबर २०२५ पासून दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ उमेदवारांचे नामनिर्देशन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु होती, काल दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ रोजी नगरसेवक पदासाठी एकूण १०६ अर्ज तर नगराध्यक्ष पदासाठी एकूण १२ अर्ज प्राप्त झाले होते.

दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून नामनिर्देशनपत्राची छानननी प्रक्रिया मा. निवडणूक निर्णय अधिकारी प्रा. संजय खडसे यांनी सुरु केली , काल नगरसेवक पदासाठी एकूण ८७ उमेदवारांनी मिळून हे १०६ अर्ज दाखल केले होते, त्यापैकी आजच्या पूर्ण छाननी प्रक्रियेअंती एकूण नगरसेवक पदासाठी आलेल्या ८७ उमेदवारांच्या एकूण १०६ अर्जापैकी एकूण ५ उमेदवारांना अपात्र तसेच एकूण ८ अर्ज हे अस्विकृत करण्यात आले आहेत. छाननी अंती हे अपात्र उमेदवार तसेच अस्विकृत अर्जानंतर सध्या ८२ पात्र उमेदवारांचे एकूण ९८ नामनिर्देशन अर्ज स्विकृत करण्यात आले आहेत.

तसेच नगराध्यक्ष पदासाठी एकूण ८ उमेदवारांनी १२ नामनिर्देशन अर्ज केले होते, त्यापैकी फक्त एका उमेदवाराचा नामनिर्देशन अर्ज अस्विकृत करण्यात आला आहे, सध्या एकूण ८ उमेदवारांचे ११ नामनिर्देशन अर्ज स्वीकृत करण्यात आले आहेत. नगराध्यक्ष पदाचा एक अर्ज अस्विकृत करण्यात आला.

म्हस्के दिपाली योगेश ( प्रभाग क्रमांक १ अ पक्षाचा एबी फॉर्म नसल्यामुळे), सोनल विजय तायडे( प्रभाग क्रमांक ३ ब पक्षाचा एबी फॉर्म नसल्यामुळे), समीना बेगम खान ( प्रभाग क्रमांक ४ ब पक्षाचा एबी फॉर्म नसल्यामुळे), खुरपे मंगेश विश्वंभर आप्पा ( प्रभाग क्रमांक ४ ब पक्षाचा एबी फॉर्म नसल्यामुळे), बारवकर दिनेश रामदास (९ ब पक्षाचा एबी फॉर्म नसल्यामुळे) हे पाच उमेदवार नामनिर्देशन प्रक्रियेतून अपात्र ठरले आहेत. तसेच संगीता कोरडे (प्रभाग क्रमांक ७ ब ), पठाण वाजीब मुजीब खान ( प्रभाग क्रमांक ८ ब ), साक्षी संजय वायकोस ( प्रभाग क्रमांक ८ ब ) या तीन उमेदवारांनी अपक्ष अर्ज भरला असल्यामुळे यांची उमेदवारी कायम ठेवून यांचे अपक्ष अर्ज स्वीकृत करण्यात आले आहेत.

आजच्या या छाननी प्रक्रियेसाठी मा. निवडणूक निरीक्षक जी.पी. साबळे साहेब,मा. निवडणूक निर्णय अधिकारी प्रा. संजय खडसे, मा. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. आशिष बोबडे , मा. तहसीलदार अजित दिवटे, मा. गटविकास अधिकारी अजितकुमार बांगर,मा. नायब तहसीलदार डॉ. प्रवीणकुमार वराडे, नायब तहसीलदार नितीन बढे, मा. गटशिक्षणाधिकारी स्वप्नील निकम, महिला बाल विकास अधिकारी जीवन राठोड, प्रसार माध्यम नोडल अधिकारी प्रकाश शिंदे तसेच इतर सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# शासकीय निवासी शाळेत नशा मुक्त भारत अभियान विविध स्पर्धा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया : तालुक्यातील अनुसूचित जाती आणि नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा, नंगपुरा मुर्री येथे नशा मुक्त भारत अभियान अंतर्गत सदर शाळेत नशेवर निर्बंध घालण्यासाठी निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा व चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या.

**विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद : निबंध, चित्रकला, वक्तृत्व व रांगोळी स्पर्धा**

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठुले यांच्या अध्यक्षतेखाली शाळेतील शिक्षक आशिष शहारे, साधना पारधी, मुन्नाभाई नंदागवळी, पी. एल. लांजेवार, प्रदीप ढवळे, कार्तिक शहारे, दीक्षा तुरकर आदी उपस्थित होते.



अभियान' शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये 'नशामुक्ती' या महत्त्वाच्या विषयावर जनजागृती करण्यासाठी स्पर्धांचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळाला, तसेच त्यांना सामाजिक जबाबदारीची जाणीव झाली.

चित्रकला स्पर्धेत यश नंदेश्वर प्रथम, अनुराग धमगाये द्वितीय, मानव गोंधूळे तृतीय, निबंध स्पर्धेत रेयांश वालदे प्रथम, तन्मय वासनिक द्वितीय, अंश राऊत तृतीय, रांगोळी स्पर्धेत दिपांशू मोटघरे व हिरेन जांभूळकर प्रथम, तन्मय कोचे व हितेश खंडारे द्वितीय, सुजित मेश्राम व अयान मेश्राम तृतीय तसेच वक्तृत्व स्पर्धेत प्रणय शहारे प्रथम, अशीत दूधे द्वितीय व स्नेहील शहारे तृतीय असे क्रमांक प्राप्त करून नशा मुक्त भारत अभियान अंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात आले.

# पंढरपूर नगरपरिषद निवडणुक; नगराध्यक्षपदाचे ८ तर नगरसेकपदाचे ३२१ अर्ज मंजूर : निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी ८ तर नगरसेवक पदासाठी ३६६ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते.. त्याची मंगळवार दि. १८ रोजी उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात आली. या छाननीत नगराध्यक्ष पदासाठी ०८ तर नगरसेवक पदासाठी ३६६ दाखल उमेदवारी अर्जापैकी ३२१ मंजूर तर ३९ अर्ज नामंजूर करण्यात आले आहेत.तसेच ६ अर्जांवर आक्षेप घेण्यात आला आहे. अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर यांनी दिली.

पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीसाठी सोमवारी शेवटच्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी इच्छुकांनी मोठी गर्दी केली होती. नगराध्यक्ष पदासाठी ८ तर नगरसेवक पदासाठी ३६६ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. दाखल झालेल्या या अर्जाची छाननी मंगळवार दि. १८ रोजी नगरपरिषद सभागृहात निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

नामनिर्देशन पत्र मागे घेण्यासाठी दि.१९ ते २१ नोव्हेंबर हा कालावधी असेल. दि. २६ नोव्हें. रोजी निवडणूक चिन्ह वाटप व अंतीम उमेदवार यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे. या निवडणुकीसाठी २ डिसेंबर रोजी मतदान तर ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. अशी माहिती सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

**या वेळेत करण्यात आली छाननी–** सकाळी ११ वाजता नगराध्यक्ष व प्रभाग क्र. १ चे अर्ज, सकाळी ११.३० वाजता प्रभाग क्र.२, दुपारी १२.०५ वाजता प्रभाग क्र.३ व ४, दुपारी १ वाजता प्रभाग ५ व ६, दुपारी १.३० वाजता प्रभाग क्र.७ व ८, दुपारी २ वाजता प्रभाग क्र.९ व १०, दुपारी ३ वाजता प्रभाग क्र.११ व १२, दुपारी ३.३० वाजता प्रभाग क्र.१३ व १४, दुपारी ४ वाजत प्रभाग क्र.१५ व १६ तर सायंकाळी ४.३० वाजता प्रभाग क्र.१७ व १८ मधील उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात आली.

# नळदुर्ग नगर परिषद नगराध्यक्ष पदासाठी ८ तर नगरसेवक पदासाठी १८९ उमेदवारी अर्ज दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी ( एस. के. गायकवाड ): तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखे दिवशी म्हणजे दिनांक १७ नोव्हेंबर २२५ रोजी नगराध्यक्ष पदासाठी एकूण १९ अर्ज तर नगरसेवक पदासाठी विविध प्रभागातून एकूण १८९ उमेदवारी. अर्ज दाखल झाल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे

या नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी दिनांक १० नोव्हेंबर २२५पासून नामनिर्देशन अर्ज भरण्याला सुरुवात झाली असता दि.१३ नोव्हेबर रोजी फक्त १ उमेदवारी अर्ज दाखल झाला होता तर दि.१४ नोव्हेंबर रोजी ५ ....=छ=छ=छ .=छ=छ...वउमेदवारानी नगर सेवक पदासाठी उमेदवारी दाखल केले होते. तसेच दि १५ नोव्हेंबर रोजी बेगवेगळ्या प्रभागतुन एकून ११ उमेदवारानी नगरसेवक पदासाठी आपले नामनिर्देशन अर्ज दाखल केले होते. दिनांक १६ व १७ नोव्हेंबर रोजी उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला वेग येऊन शेवटी अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखे दिवशी म्हणजेच दिनांक १७ नोव्हेंबर रोजी एकूण नगरसेवक पदासाठी १८९ अर्ज दाखल झाले असून नगराध्यक्ष पदासाठी एकूण आठ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत त्यामध्ये राष्ट्रीय काँग्रेसचे अशोक जगदाळे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गतचे संजय बताले, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे मेहबूब शेख, एमआयएमचे शहबास काझी भाजपाचे अप्पासाहेब धरणे व इतर असे मिळून आठ उमेदवारांनी नगराध्यक्ष पदासाठी आपले नाम निर्देशन दाखल केले आहे.असे असले तरी अर्ज काढून घेण्याच्या शेवटच्या तारखे नंतर खऱ्या अर्थाने या निवडणुकीतील चित्र स्पष्ट होईल.

# शिक्षक, अधिकारी आणि कर्मचारी स्पर्धेत मनोजकुमार गुरव यांची विभाग स्तरावर निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
उमरगा /प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य पुणे, यांच्यामार्फत देशात महाराष्ट्रात पहिल्यांदाच शिक्षण विभागासाठी शिक्षक. अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी विविध ४३ स्पर्धेचे आयोजन सध्या राज्यभरात सुरू आहे. त्यामध्ये श्री सिद्धेश्वर विद्यालय कसगी येथील विज्ञान विषय शिक्षक मनोजकुमार सुर्यकांत गुरव यांनी गटशिक्षणाधिकारी कार्यालय उमरगा येथे आयोजित विज्ञानातील हॅकेथॉन स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक येऊन जिल्हास्तरावरून विभागीय स्तरावर निवड झाली आहे.

यात स्वनिर्मित ए.आय टेक्नॉलॉजी वरती अपघात रोखणारी कार, भारतीय जवानाच्या सुरक्षतेसाठी युनिफॉर्म प्रयोग साहित्य सादर केले आहेत.

ह्या निवडीबद्दल, श्री सिद्धेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विठ्ठलराव पटणे सेक्रेटरी विठ्ठलराव बदोले,गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती अमोल राजपूत, केंद्रप्रमुख श्रीमती मुदगडे ,स्पर्धा समन्वयक प्रभाकर पांचाळ,श्रीमती माशाळकर यांनी निवडीबद्दल अभिनंदन आणि विभागीय स्तरासाठी शुभेच्छा दिले आहेत.

दिव्यांग व ग्रामीण संघांनी दाखवला दमदार खेळ – प्रेक्षकांची मोठी उपस्थिती

# शशिकांत शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त 'राष्ट्रवादी चषक २०२५' उत्साहात




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : होप मिरर फाउंडेशन आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने शशिकांत शिंदे साहेबांच्या वाढदिवसानिमित्त 'राष्ट्रवादी चषक २०२५' या मर्यादित षटकांच्या क्रिकेट स्पर्धेचे भव्य आयोजन व सूत्रसंचालन रमजान शेख (प्रदेश संघटक सचिव – राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, व संस्थापक अध्यक्ष – होपमिरर फाउंडेशन) यांनी केले. स्टार ओवे मैदानावर झालेल्या या स्पर्धेला दिव्यांग महिला–पुरुष तसेच ग्रामीण संघांचा मोठा प्रतिसाद मिळाला. प्रवेश विनामूल्य असल्याने मोठ्या संख्येने खेळप्रेमींनी हजेरी लावली.

या विशेष उपक्रमामध्ये दिव्यांग खेळाडूंनी दिलेल्या उत्कृष्ट कामगिरीने सर्वांचे मन जिंकले. महिलांचा स्वतंत्र सामना हा या स्पर्धेचा मुख्य आकर्षण ठरला. ग्रामीण विभागातूनही अनेक सक्षम संघांनी सहभाग घेत शानदार कामगिरी केली. तसेच पोलीस विभाग व महानगरपालिका विभाग यांनाही संधी देण्यात आली होती.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार बाळाराम पाटील, बबन पाटील, सतीश पाटील, मनोज प्रधान, संतोष घरत, तुषार पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यांच्याकडून संघांना प्रोत्साहन देत सामाजिक बांधिलकी आणि क्रीडा संस्कृतीला चालना देणाऱ्या या उपक्रमाचे कौतुक करण्यात आले.

स्पर्धेत विजेत्या संघांना आकर्षक पारितोषिके देण्यात आली. ग्रामीण गटातील प्रथम पारितोषिक ₹५०,५५०/- तर द्वितीय पारितोषिक ₹२०,२२०/- देण्यात आले. दिव्यांग पुरुष व महिलांच्या गटातील विजेत्यांना अनुक्रमे ₹२१,१११/- व ₹११,१११/- चे पारितोषिक जाहीर करण्यात आले. याशिवाय उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज, क्षेत्ररक्षक आणि मालिकावीर यांनाही विशेष सन्मान देण्यात आला. क्रिकेटमधून समाजजागृती व दिव्यांग सक्षमीकरणाचा संदेश देणारी ही स्पर्धा आगामी काळातही आयोजित करण्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला.

**ग्रामपंचायतीकडून विल्हेवाट व्यवस्थेकडे दुर्लक्ष; नागरिक, विद्यार्थी व प्रवासी हैराण**

# पडघा पंचशीलनगर रस्त्यावर प्लास्टिक कचऱ्याचा खच; दुर्गंधी व रोगराईचा धोका वाढला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा ग्रामपंचायत हद्दीतील पंचशील नगर रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक कचऱ्याचा खच साचल्याने नागरिकांचे आरोग्य गंभीर धोक्यात आले आहे. प्लास्टिकचे दुष्परिणाम सर्वांना माहिती असतानाही ग्रामीण भागात त्याचा वापर होत असल्याने पर्यावरणाच्या ऱ्हासासोबतच पशुपक्ष्यांना देखील बाधा होत आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना प्लास्टिक पिशव्या, चहाचे रिकामे कप, खराब पाले- भाज्या, प्लास्टिक बॉटल, कॅरीबॅगसह सर्व प्रकारचा घनकचरा साचलेला आहे. त्यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली असून मशा-कीटकांचा उपद्रव वाढला आहे. या मार्गावरून जाणाऱ्या नागरिकांना, शाळकरी विद्यार्थ्यांना आणि प्रवाशांना दररोज नाहक त्रास सहन करावा लागत आहे.



राज्यात ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांवर बंदी असतानाही ग्रामीण भागात या प्लास्टिक पिशव्या मोठ्या प्रमाणावर वापरल्या जात आहेत. दुकानादारांकडून पिशव्या दिल्या जात असून ग्राहकही त्या सहज घेतात आणि वापरून झाल्यावर रस्त्याच्या कडेला टाकतात. परिणामी, पंचशीलनगर परिसरात कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे. या साचलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत पडघा ग्रामपंचायतीकडून कोणतीही ठोस कारवाई न केल्याने स्थानिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. पडघा ग्रामपंचायत कचरा कधी उचलणार? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत असून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली जात आहे.

# डुबेरे जनता विद्यालयात राष्ट्रीय जनजाती गौरव दिन पंधरवडा संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर प्रतिनिधी :- मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचलित डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात वीर भगवान बिरसा मुंडा यांचा जन्मदिवस राष्ट्रीय जनजाती गौरव दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला.अध्यक्षस्थानी विद्यालयालयाचे प्राचार्य रंगनाथ उगले होते.व्यासपीठावर पर्यवेक्षिका जयश्री पगारे ,सीमा गोसावी, रेखा खंडीझोड, कचेश्वर शिंदेउपस्थित होते.

उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. आदिवासी गीताचे देखील सादरीकरण करण्यात आले यात सायली आव्हाड,शितल वारुंगसे ,कावेरी शेलार,खुशी वाघ,कावेरी काळुंगे,प्रगती वाजे,अक्षदा सांगळे,तन्वी वाजे या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. तसेच निबंध व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य उगले म्हणाले भगवान बिरसा मुंडा हे भारतीय आदिवासी समाजातील सर्वात तेजस्वी प्रेरणादायी आणि क्रांतिकारी व्यक्तिमत्वांपैकी एक म्हणून ओळखले जातात.ब्रिटिश सत्ते विरोधात आदिवासींचा आवाज त्यांनी बुलंद केला .त्यांच्या जन्मदिवशी भारतात राष्ट्रीय जनजागृती दिन म्हणून साजरा केला जातो हेच त्यांच्या कार्याची मोठी साक्ष आहे.भगवान बिरसा मुंडा आदिवासींसाठी नसून संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे.त्यामुळे आजही लोकांच्या हृदयात अजरामर आहेत म्हणूनच इतिहासात त्यांचे स्थान सदैव उज्ज्वल राहील.आरोही जाधव ,आराध्या वाजे,स्नेहा शिंदे यांनी मुंडा यांच्या जीवन व कार्याविषयी माहिती दिली.विद्यार्थिनींना सांस्कृतिक प्रमुख सुनिल ससाणे, जयश्री गोहाड व मारुती डगळेयांचे मार्गदर्शन लाभले.

सूत्रसंचालन कुमारी गौरी वाजे हिने केले आभार सोमनाथ गिरी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सांस्कृतिक समितीने विशेष मेहनत घेतली.

# शिक्षक समायोजनात चुका

## गटशिक्षणाधिकारी अरबाळे यांना प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांची नोटीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर प्रतिनिधी : बंद झालेल्या शाळा व अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे अन्य शाळेत समायोजन करताना मनमानी पध्दतीने कार्यवाही करून अनेक चुका केल्याने अक्कलकोट पंचायत समितीतील प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे यांना प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी नोटीस बजावली असून सात दिवसांत सर्व कागदपत्रांसह अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

गटशिक्षणाधिकारी अरबाळे यांनी अक्कलकोट तालुक्याचा पदभार घेतल्यापासून अनेक प्रकरणात चुकीच्या पध्दतीने कामकाज केले असून अतिरिक्त झालेल्या शिक्षक समायोजनातही त्यांनी चुकीची पध्दत वापरली असून यामुळे शिक्षकांवर अन्याय झाला आहे, अशी तक्रार मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे अक्कलकोट तालुकाध्यक्ष माणकेश्वर कट्टीमनी यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम व प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्याकडे केली होती. कुणाच्या तरी दबावापोटी गटशिक्षणाधिकाऱ्यांनी ही कृती केली असल्याचा आरोपही कट्टीमनी यांनी केला आहे. चुकीच्या व मनमानी कारभाराबाबत गटशिक्षणाधिकारी अरबाळे यांची यापूर्वीही अनेक वेळा चौकशी झाली आहे. या चौकशीत ते दोषी आढळले आहेत; परंतु जिल्हा परिषद प्रशासनाने त्यांच्यावर कारवाई केली नाही. अरबाळे यांच्यावरील कारवाई रोखण्यासाठी राजकीय नाही तर प्रशासकीय वरदहस्त असल्याचे कट्टीमनी यांनी म्हटले होते.

त्यानुसार कट्टीमनी यांच्या या तक्रारीची व आरोपांची चौकशी करण्यासाठी शिक्षणाधिकारी शेख यांनी गटशिक्षणाधिकारी अरबाळे यांना नोटीस काढून सर्व कागदपत्रांची मागणी करून सात दिवसांत अहवाल देण्यास सांगितले आहे.

## आम्रपाली सैदप्पा झळकी यांचा उमेदवारी अर्ज दाखल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी नगरपरिषदेच्या प्रभाग क्रं.१-अ च्या रिपाइं (आठवले) व भारतीय जनता पक्ष महायुतीच्या अधिकृत उमेदवार म्हणून कुमारी आम्रपाली सैदप्पा झळकी यांची अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार विनायक मगर, मुख्याधिकारी लक्ष्मीकांत कहार यांच्या कडे दाखल करतांना दुधनी कृ.उ.बा.समितीचे सभापती सातलिंगप्पा परमशेट्टी, शंकर भांजे, रिपाइं जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, हणमंत कलशेट्टी, गोरखनाथ धोडमनी, काशिनाथ यरगल, चिट्या जमादार, महेदिमिया जिडगे, यूशूफ, संतोष ठक्का व इतर उपस्थित होते.

## निफाड श्री माणकेश्वर वाचनालयात स्वर्गीय इंदिराजी गांधी जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान स्व.श्रीमती इंदिराजी गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली असून श्री माणकेश्वर वाचनालयाचे ज्येष्ठ संचालक तनवीर राजे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.या प्रसंगी श्री माणकेश्वर वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार यांनी आपले मनोगत व्यक्त केले, या वेळी ज्येष्ठ संचालक दत्ताकाका उगावकर, बाळासाहेब कर्डीले, नईम पठाण, अशोक पगारे, प्र.ग्रंथपाल नितीन बनसोडे, नंदकुमार पुंड, अनिता इस्ते व मान्यवर उपस्थित होते.




## विष्णूपद उत्सव २०२५ : विष्णूपद मंदिर येथे मंदिर समिती मार्फत पुरेसा सोई सुविधा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (ता.१९) मार्गशिर्ष शुध्द ०१ ते मार्गशिर्ष वद्य ३० या कालावधीत श्री विठ्ठलाचे वास्तव्य विष्णूपदावर असते, अशी धारणा आहे. त्यामुळे महिनाभर विष्णूपद येथे दर्शनास भाविकांची गर्दी असते. यावर्षी दिनांक २० नोव्हेंबर ते १९ डिसेंबर २०२५ दरम्यान विष्णूपद उत्सव संपन्न होत असून, या उत्सवास दिनांक २० नोव्हेंबर पासून सुरवात होत असून, गोपाळपूर रोडवरील विष्णूपद मंदिर येथे मंदिर समिती मार्फत भाविकांना पुरेसा सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.





मंदिर समितीने पंढरपूर शहर व परिसरातील २८ परिवार देवता सन २०१५ मध्ये ताब्यात घेतल्या असून, त्याचे व्यवस्थापन मंदिर समिती मार्फत चालविण्यात येते. त्यामध्ये गोपाळपूर रोडवरील चंद्रभागा नदीपात्रातील विष्णूपद मंदिराचा समावेश असून, या ठिकाणी दर्शनरांगेसाठी बॅरीकेटींग, सुरक्षा व्यवस्थेकामी कमांडोज, पिण्याच्या पाण्याची सोय, चांगली स्वच्छता व्यवस्था, अभिषेक पुजा भाविकांना उपलब्ध करून देणे, विद्युत रोषणाई व इतर अनुषंगीक व्यवस्था करण्यात येत असून, सदर ठिकाणी वन भोजनाची प्रथा असल्याने स्वच्छतेसाठी जादा कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच पंढरपूर नगरपरिषद प्रशासन व पोलीस प्रशासन यांना देखील पत्रव्यवहार करून आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देणेबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे. सदर ठिकाणी नियोजनाच्या अनुषंगाने आज दि. १९ नोव्हेंबर रोजी कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, प्र. व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत, लेखा अधिकारी मुकेश अनेचा यांनी स्थळ पाहणी केली. यावेळी बांधकाम विभाग प्रमुख बलभिम पावले, सुरक्षा विभाग प्रमुख राजाराम ढगे, विद्युत विभाग प्रमुख शंकर मदने तसेच परिवार देवता विभाग प्रमुख अतुल बक्षी उपस्थित होते.

विष्णूपद मंदिर येथे एका मोठ्या शिळेवर मध्यभागी देवाचे समचरण आणि देहुडाचरण पावलं उमटलेली आहेत. त्यासोबत काठी ठेवल्याची आणि काल्याच्या वाडग्याची खूण दिसते. या शिळेवर दगडी मंडप उभारण्यात आला आहे. या मंडपाच्या खांबावर चतुर्भुज समचरण विष्णुमूर्ती आणि देहुडाचरण मुरलीधराची म्रूती कोरण्यात आली असून, विठ्ठलाने आपल्या सवंगड्यासह व गाईंसह क्रीडा केल्या व भोजन केलं. तेव्हा इथं देवाची आणि गाईची पावलं उमटली. विठ्ठल हे विष्णूचे अवतार असल्यानं इथं उमटलेल्या पावलांमुळे या ठिकाणाला विष्णुपद असं नाव मिळालं. मार्गशीर्ष महिन्यात विठुराया या ठिकाणी निवासाला येतो, असं मानलं जातं. त्यामुळे मार्गशीर्ष महिन्यात या ठिकाणी भाविक दर्शनासाठी मोठी गर्दी करतात. याशिवाय, भाविक नौकानयनाचा आनंद घेतात व दर्शन घेऊन वनभोजनाचा आनंद लुटतात. येथे येणाऱ्या सर्व भाविकांना मंदिर समिती मार्फत पुरेशा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देऊन तेथील सर्व प्रथा व परंपरेचे पालन करण्याची दक्षता मंदिर समितीने घेतल्याचे प्र. व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी यावेळी सांगीतले.

## ज्येष्ठ पत्रकार एजाज हुसेन मुजावर यांचे निधन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : ज्येष्ठ पत्रकार, लोकसत्ताचे सोलापूर जिल्हा प्रतिनिधी एजाज हुसेन मुजावर यांचे थोड्या वेळापूर्वी निधन झाले आहे.

एजाजहुसेन मुजावर अभ्यासू आणि व्यासंगी पत्रकार होते. संचारपासून त्यांनी पत्रकारितेला सुरुवात केली. स्व.रंगाअण्णा वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी पत्रकारितेचे धडे गिरवले. जिल्ह्यातील विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांशी त्यांचा थेट संपर्क होता. गेल्या ३८ वर्षांचा त्यांचा पत्रकारितेचा प्रवास आज संपला.

सोलापूर शहरातील राजकीय, सामाजिक घटनांची त्यांच्याकडे खडानखडा माहिती होती. एका अर्थाने सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील घडामोडींचा संदर्भ ग्रंथ म्हणूनच त्यांना आेळखले जायचे.

निस्पृह , निरपेक्ष, धाडसी पत्रकारितेचा मानदंड असा त्यांचा लौकिक होता. शहर, जिल्ह्यातील राजकीय नेते त्यांचा सल्ला घेत असत तर नवोदित पत्रकार कोणताही संदर्भ त्यांच्याकडून जाणून घेत असत.

तीन महिन्यापूर्वी त्यांना विस्मृतीचा आजार जडला. वैद्यकीय तपासणी मेंदूवर गाठ असल्याचे निष्पन्न झाले. त्यांना तातडीने मुंबईच्या रिलायन्स हॉस्पिटलमध्ये दाखल करून शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र या शस्त्रक्रियेने काही काळ त्यांना रिलीफ मिळाला. गेल्या आठवड्यात पुन्हा त्रास सुरू झाला.

आज सकाळीच त्यांना मुंबईहुन सोलापुरात आणलं होतं. शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आज गुरुवारी सकाळी ९.१५ वाजता त्यांची प्राणजोत मालवली.

## कल्याणशेट्टी शाळेत घनकचरा व्यवस्थापन कार्यशाळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालयात अक्कलकोट नगरपरिषद आयोजित स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी २.० अंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी नगरपरिषद नियुक्त तज्ञ मार्गदर्शक अजय साखरे व महेश वागदरे यांनी मार्गदर्शन केले.



पर्यावरणात होत असलेले प्रदूषण टाळण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन जनजागृतीची गरज ओळखून महाराष्ट्र शासनाच्या वतीने कचरा मुक्त आणि स्वच्छ शहरे अभियान नागरी २.० सुरू केले आहे. विशेषतः शालेय विद्यार्थ्यांना घनकचरा व्यवस्थापन विषयी माहिती दिल्यास भविष्यात ते सुज्ञ नागरिक बनतील, आणि योग्य पद्धतीने कचऱ्याचे विल्हेवाट लावतील.

सुका कचरा,ओला कचरा,सॅनिटरी कचरा आणि घातक कचरा असे कचऱ्याचे चार प्रकार असून घातक व सॅनिटरी कचऱ्याचे विल्हेवाट कशी लावावी या संदर्भात विद्यार्थ्यांना समोर बोलावून चार डस्टबिन बनवून, फ्लॅश कार्ड्स व चित्राच्या माध्यमातून यावेळी काही प्रात्यक्षिके दाखवण्यात आले.

या कार्यशाळेस प्रशालेचे मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, सेमी विभागाचे दिगंबर जगताप,सागर मठदेवरु,कल्पना स्वामी, निशिगंधा सोमेश्वर आदी शिक्षक व प्रशालेतील इयत्ता ५ वी ते १० वी वर्गातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## शेडोळ येथे विवीध विकास कामाचा शुभारंभ



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर प्रतिनिधी/अमर जाधव : आज शेडोळ ता.निलंगा येथे विविध विकास कामांचे उद्घाटन पार पडले , निलंगा तालुक्याचे भाग्यविधाते माजी मंत्री तथा आमदार संभाजी भैय्या पाटील निलंगेकर यांच्या आमदार निधीतून जनसुविधा अंतर्गत शैडोळ येथील कासार गल्ली व माळी गल्ली मध्ये पेव्हर ब्लॉक रस्त्याचे उद्घाटन झाले ,तसेच दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत शेडोळ बस स्टॅंड ते पांडूरंग अरविंद धुमाळ यांच्या दुकानापर्यंत सिमेट रस्त्याच्या कामाचे भुमी पूजन मान्यवरांचे हस्ते संपन्न झाले

यावेळी माजी.जि.प सदस्य श्री.व्यंकटराव (अप्पा)धुमाळ, सरपंच श्री.स्वरूप धुमाळ, उपसरपंच श्री.विशाल धुमाळ, तंटामुक्ती अध्यक्ष श्री.शंकर धुमाळ, श्री.गुणवंत जाधव, श्री.प्रभाकर धुमाळ, श्री.सतीश गुरुजी धुमाळ, श्री.माधव पाटील, श्री.संजय सावकार धुमाळ, श्री.माणिक पाटील, श्री.काकासाहेब धुमाळ, श्री.रामराव धुमाळ, श्री.अंकुश शेळके, श्री.सुभाष जाधव, श्री.गोविंद धुमाळ, श्री.शहाजी क्षीरसागर श्री.गोविंद जाधव, श्री.सुरेश आवले, श्री.भास्कर कांबळे श्री.विलास गवळी, श्री.गोविंद भोजने, श्री. श्री. बब्रुवान हजारे श्री.जमील मनियार ई मोठ्या प्रमाणात मान्यवर व शेडोळ ग्रामस्थ उपस्थित होते

### प्रकट मुलाखतीमधून ॲड उज्वल निकम यांनी उलगडला जीवन प्रवास

### नागरिकांसह मान्यवरांची उपस्थिती

# डॉक्टर व्हायचं होतं पण झालो वकील : पद्मश्री ॲड. उज्वल निकम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर,(प्रतिनिधी):- आईची इच्छा होती मी डॉक्टर व्हावे म्हणून प्रयत्न केला परंतु अवघ्या २ मार्कांने माझी डॉक्टर होण्याची इच्छा अपूर्ण राहिली पण वडीलांच्या इच्छेने मी वकील झालो. असे सांगून विशेष सरकारी वकील पद्मश्री खासदार उज्वल निकम यांनी आपला जीवन प्रवास उलगडला. महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूर यांच्या वतीने बुधवारी शिवछत्रपती रंगभवन मध्ये आयोजित प्रकट मुलाखतीमध्ये ते बोलत होते. प्रिसिजन कंपनीचे जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे यांनी त्यांची मुलाखत घेतली. घरात वडील बॅरिस्टर होते म्हणून वडीलांची इच्छा होती की मी वकील व्हावे पण माझी इच्छा नव्हती. सहकाराच्या एका खटल्याने वकीलीची सुरूवात झाली. जळगांव येथील खटल्यातून मला मुंबई बॉम्बस्फोटात विशेष सरकारी वकील म्हणून काम करण्याची संधी मिळाली.





जळगांव ते मुंबई असा प्रवास करत असताना अनेक संवेदनशील आणि महत्वाच्या खटल्यात सरकारची बाजू मांडून गुन्हेगारांना शिक्षे पर्यत पोहोचवण्यात यश आले. त्यातच मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात महत्वाची भूमिका आंतरराष्ट्रीयस्तरावर मांडता आली. माझी भावना नेहमी माझा देश प्रथम अशीच आहे म्हणूनच दहशतवादी कसाबला फाशी पर्यत आणि पाकीस्तानचा दहशतवादी चेहरा उघडा पाडण्यापर्यत यश मिळाले.

संजय दत्त आणि ९३ चा बॉम्बस्फोट या प्रश्नावर ते म्हणाले संजय दत्त याने जर आधीच सुरक्षा यंत्रणांना सांगितले असते तर बॉम्बस्फोट झाले नसते. नेता असो की अभिनेता खोटी गांधीगीरी पांघरून पाप धुता येत नाही. आंतकवादाला कोणताच धर्म नसतो असेही ते म्हणाले. कसाब आणि बिर्याणी हे केवळ एक वकीली युक्तीवाद होता. मिडिया ट्रायलचा न्यायाधीशावर परिणाम होत नाही असे माझे मत आहे.

तरूण वकीलांनी कायद्याचा अभ्यास चांगला करावा, नेहमी सत्य सांगावे, कायद्याचे संरक्षण करावे असा सल्लाही त्यांनी एका प्रश्नावर दिला. निरपेक्ष आणि निधर्मी भावनेतूनच खरा न्याय मिळतो.

निवडणुकीला उभा राहणे ही चूक का या प्रश्नावर ते म्हणाले. अवघ्या १० दिवसापुर्वी निवडणुकीला उभे राहण्यासाठी सांगण्यात आले त्यामुळे तयारी नव्हती तरीही निवडणूक लढवली जर माझा मतदारसंघ तुरूंग असता तर मी इतर कोणालाही पराभूत केलो असतो असे ते गंमतीने म्हणाले. मी स्वतःला डॉन समजतो मी बलवान आहे. अनेक गुन्हेगार मला घाबरतात असेही ते म्हणाले.

कुटुंबाला वेळ देता का या प्रश्नावर ते म्हणाले माझा देशच माझे कुटुंब आहे. जळगांव पासून सुरू झालेला जीवनाचा प्रवास मुंबई आणि आता राज्यसभेचा खासदार असा यशस्वीपणे सुरू आहे यामध्ये मी समाधानी आहे असेही ते म्हणाले. तब्बल दीड तास सुरू असलेल्या प्रकट मुलाखतीमध्ये माधव देशपांडे यांनी अनेक महत्वाचे प्रश्न विचारत निकम यांना बोलते केले. पद्मश्री ॲड उज्वल निकम यांनीही दिलखुलासपणे प्रत्येक प्रश्नाला उत्तरे दिली.

प्रारंभी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यवाह जितेश कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले आणि आभार व्यक्त केले तर उज्वल निकम आणि माधव देशपांडे यांचा परिचय अविनाश महागांवकर यांनी केला. नंतर ॲड उज्वल निकम यांच्यावरील चित्रफित दाखवण्यात आली. नंतर प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेचे कार्यकारी अभियंता दिनेश परदेशी यांच्या हस्ते ॲड उज्वल निकम यांचा सत्कार करण्यात आला त्यानंतर माधव देशपांडे यांचा सत्कार इंद्रजीत पवार यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी मसापचे अध्यक्ष प्रा.दीपक देशपांडे, कार्याध्यक्ष प्रशांत बडवे उपस्थित होते. या कार्यक्रमाला कोषाध्यक्ष अमोल धाबळे,कार्यकारणी सदस्य प्रकाश मोकाशे, पृथा हलसगीकर, मेधा कुलकर्णी, प्रसिध्दी प्रमुख विनायक होटकर यांच्यासह जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, योग शिक्षिका सुधा अळ्ळीमोरे, सिध्देश्वर किणगी,विशाल शिंदे, निलेश शहा, सात्विक बडवे, रसिका बडवे आदींसह मोठ्यासंख्येने श्रोते उपस्थित होते.